# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

करोना व्हायरसमुळे मिस्साला न जाऊ शकणाऱ्यांसाठी घरी करावयाची प्रार्थना

**येशूच्या अतिपवित्र हृदयाचा सोहळा - शुक्रवार १९ जून २०२०**

## दूताचा मरियेला संदेश

कुटुंब प्रमुख : प्रभूच्या दूताने मरियेला संदेश दिला

सर्व : आणि ती पवित्र आत्म्याच्या योगाने गर्भवती झाली

कुटुंब प्रमुख : नमो कृपापूर्ण मरिये .... .

कुटुंब प्रमुख : पहा मी प्रभूची दासी आहे

सर्व : तुझ्या शब्दाप्रमाणे माझ्याठायी होवो

कुटुंब प्रमुख : नमो कृपापूर्ण मरिये .... .

कुटुंब प्रमुख : आणि देवशब्द मनुष्य झाला

सर्व : आणि आम्हामध्ये राहिला

कुटुंब प्रमुख : नमो कृपापूर्ण मरिये .... .

कुटुंब प्रमुख : ख्रिस्ताने दिलेल्या वचनास आम्ही पात्र व्हावे म्हणून

सर्व : हे पवित्र देवमाते, आम्हासाठी विनंती कर .

**आपण प्रार्थना करू या :** हे प्रभो, तुझ्या पुत्राच्या देहधारणाचा संदेश दूताने आम्हाला दिला. त्याच्या दुःखसहनाच्या व कुसाच्याद्वारे आम्हाला पुनरुत्थानाचे वैभव मिळावे म्हणून आमची मने तुझ्या कृपेने संपन्न कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.

**गायन : नवे गीत गा (चरण ३) ......गीत क्र. ०३**

कुटुंब प्रमुख : पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा यांच्या नावे,

सर्व : आमेन.

कुटुंब प्रमुख : परमेश्वर आपले घर आणि हृदय विपुल शांतीने भरीत असतो. आपण त्याची आराधना करू या. परमेश्वर सदैव सुवंदित असो.

सर्व : परमेश्वर सदैव सुवंदित असो.

## पश्चाताप विधी

कुटुंब प्रमुख ः प्रिय कुटुंबियांनो, या प्रार्थना विधीत सहभागी होण्यास आपण पात्र ठरावे म्हणून आपण आपल्या पापांची आठवण करू या व ईश्वराकडे विश्वासाने क्षमा मागू या .

सर्व ः सर्वशक्तिमान परमेश्वराजवळ व तुम्हा बंधुभगिनींजवळ मी कबूल करतो की, कल्पनांनी, शब्दांनी, कृत्यांनी व हयगयीने मी फार पापे केली आहेत . (छातीवर हलकेच हात ठेवून) माझा अपराध, माझा अपराध, माझा फार मोठा अपराध . म्हणून नित्य कुमारी पवित्र मरिया, सर्व देवदूत व सर्व संत ह्यांना व तुम्हा बंधूभगिनींना मी विनंती करतो की माझ्यासाठी आपल्या प्रभू परमेश्वराजवळ प्रार्थना करा .

कुटुंब प्रमुख ः सर्वसमर्थ परमेश्वर आम्हांवर दया करो व आमच्या पापांची क्षमा करून आम्हाला सार्वकालिक जीवनाकडे नेवो .

सर्व ः आमेन .

## दयायाचना

कुटुंब प्रमुख ः हे प्रभो, आम्हावर दया कर .

सर्व ः हे प्रभो, आम्हावर दया कर .

कुटुंब प्रमुख ः हे ख्रिस्ता, आम्हावर दया कर .

सर्व ः हे ख्रिस्ता, आम्हावर दया कर .

कुटुंब प्रमुख ः हे प्रभो, आम्हावर दया कर .

सर्व ः हे प्रभो, आम्हावर दया कर .

## स्तुतीगीत ः

स्वर्गात परमेश्वराला गौरव । आणि पृथ्वीवर सज्जनांना शांती । हे प्रभो, परमेश्वरा । स्वर्गीय बापा । सर्वसमर्थ देवपित्या । आम्ही तुझी स्तुती करतो । तुला धन्यवाद म्हणतो । तुला भजतो । तुझा गौरव करतो । तुझ्या महान देणग्याबद्दल । आम्ही तुझे आभार मानतो । हे प्रभो, येशू ख्रिस्ता । एकुलत्या पुत्रा । हे प्रभो, परमेश्वरा । देवाच्या कोकरा । पित्याच्या पुत्रा । जगाची पापे दूर करणाऱ्या । तू आमची प्रार्थना स्वीकार । देवपित्याच्या उजवीकडे बसणाऱ्या । तू आम्हावर दया कर । कारण हे येशू ख्रिस्ता । देवपित्याच्या ऐश्वर्यात । पवित्र आत्म्यासह । तूच एकच पवित्र । तूच एकटा प्रभू । तूच एकटा परमोच्च आहेस । आमेन .

**आपण प्रार्थना करू या ः**

हे सर्वसमर्थ बापा, तुझा पुत्र येशू याच्या हृदयाकडून आम्हाला मिळालेल्या प्रेमाच्या दानांमुळे आमचे अंतःकरण आनंदित झाले आहे. त्याच्या दिव्य जीवनाचा स्वीकार करण्यासाठी आमची अंतःकरणे उघड व त्याच्या प्रेमाने आम्हाला आशीर्वादित करण्याचे कार्य सतत चालू ठेव. ही प्रार्थना आम्ही, तुझ्याबरोबर पवित्र आत्म्याच्या ऐक्यात सर्वकाळ जिवंत राहणारा व राज्य करणारा, एकच परमेश्वर, तुझा पुत्र आमचा प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्याद्वारे करतो.

सर्व ः आमेन.

किंवा

हे सर्वसमर्थ बापा, तुझा पुत्र येशू ह्याचे हृदय आम्ही घायाळ केले परंतु त्याने आम्हाला क्षमा व कृपा मिळवून दिली. आम्हामध्ये उपकारबुद्धी जागृत कर व पापांची भरपाई करण्यास आम्हाला साहाय्य कर. ही प्रार्थना आम्ही, तुझ्याबरोबर पवित्र आत्म्याच्या ऐक्यात सर्वकाळ जिवंत राहणारा व राज्य करणारा, एकच परमेश्वर, तुझा पुत्र, आमचा प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्याद्वारे करतो.

सर्व ः आमेन.

## पर्यायी प्रार्थना

**आपण प्रार्थना करू या ः**

हे सर्वसमर्थ बापा, मनुष्याच्या निर्दयतेमुळे घायाळ झालेल्या, तरीदेखील प्रेमाच्या विजयाचे प्रतिक व मनुष्याच्या अंतिम सुखप्राप्तीचे प्रतिज्ञापत्र असलेल्या तुझ्या पुत्राच्या हृदयाचा आम्ही सन्मान करतो. आमच्या प्रत्येक कार्यातून आम्हाला ख्रिस्ताचे दर्शन घडव. आमच्या सहवासात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीत आम्हाला ख्रिस्त पहायला शिकव. आमच्या बंधुभगिनींची प्रेमपूर्वक सेवा करून ख्रिस्ताची उपासना करण्यास आम्हाला साहाय्य कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो.

सर्व ः आमेन.

**प्रभूशब्दविधी**

**पहिले वाचन ः** अनुवाद ७ ः ६ – ११

वाचक ः अनुवाद या पुस्तकामधून घेतलेले वाचन ः

*“परमेश्वराने तुमच्यावर प्रेम करून तुम्हाला निवडले आहे.”*

मोशे लोकांना म्हणाला, “तुम्ही आपला देव परमेश्वर ह्याची पवित्र प्रजा आहात, तुम्ही त्याची खास प्रजा व्हावे म्हणून साऱ्या पृथ्वीवरील राष्ट्रांतून तुमचा देव परमेश्वर ह्याने तुम्हाला निवडून घेतले आहे. परमेश्वराने तुमच्यावर प्रेम करून तुम्हाला निवडले ह्याचे कारण तुम्ही संख्येने इतर राष्ट्रांपेक्षा पुष्कळ होता म्हणून नव्हे, उलट तुम्ही सर्व राष्ट्रांमध्ये संख्येने कमी होता. पण परमेश्वराने तुम्हाला पराक्रमी हाताने दास्यगृहातून, मिसर देशाचा राजा फारो ह्याच्या हातातून सोडवून बाहेर आणले, ह्याचे कारण हेच की, तुमच्यावर त्याचे प्रेम आहे आणि तुमच्या पूर्वजांना त्याने जे शपथपूर्वक वचन दिले होते ते पूर्ण करण्याची त्याची इच्छा आहे. तेव्हा हे लक्षात घ्या की, तुमचा देव परमेश्वर हाच देव आहे, तो विश्वसनीय देव आहे. जे त्याच्यावर प्रेम करतात आणि त्याच्या आज्ञा पाळतात त्यांच्या हजारो पिढयांपर्यंत तो आपला करार पाळून त्यांच्यावर दया करतो. जे त्याचा द्वेष करतात त्यांच्या बाबतील विलंब न लावता त्यांच्या डोळयांदेखत तो त्यांचे पारिपत्य करतो. म्हणून जी आज्ञा आणि जे विधी व नियम मी आज तुम्हाला सांगत आहे ते काळजीपूर्वक पाळा.”

हा प्रभूचा शब्द आहे.

सर्व ः देवाला धन्यवाद.

**प्रतिसाद स्तोत्र ः** **स्तोत्र १०२ ः १ – ४, ६ - ८, १०**

प्रतिसाद ः परमेश्वराचे भय धरणाऱ्यांवर त्याची दया युगानुयुग असते.

१. हे माझ्या मना, परमेश्वराला धन्यवाद दे,
हे माझ्या सर्व अंतर्यामा,
त्याच्या पवित्र नामाला धन्यवाद दे.
हे माझ्या मना, परमेश्वराला धन्यवाद दे,
त्याचे सर्व उपकार विसरू नकोस.

प्रतिसाद ः परमेश्वराचे भय धरणाऱ्यांवर त्याची दया युगानुयुग असते.

२. जो तुझ्या सर्व दुष्कर्मांची क्षमा करतो,
तो तुझे सर्व आजार बरे करतो,
तो तुझा जीव विनाशगर्तेतून वाचवतो,
तो तुला दया आणि करूणा ह्यांचा मुकूट घालतो.

प्रतिसाद ः परमेश्वराचे भय धरणाऱ्यांवर त्याची दया युगानुयुग असते.

३. जाचलेल्या सर्वांसाठी परमेश्वर नीतीची आणि
न्यायाची कृत्ये करतो.
त्याने आपले मार्ग मोशेला आणि आपली कृत्ये

इसरायलच्या वंशजांना जाहीर केली.

प्रतिसाद ः परमेश्वराचे भय धरणाऱ्यांवर त्याची दया युगानुयुग असते.

४. परमेश्वर दयाळू आणि कृपाळू आहे,
तो मंदक्रोध आणि दयामय आहे.
आमच्या पापांच्या मानाने त्याने आम्हाला
शासन केले नाही.
त्याने आमच्या दुष्कृत्यांच्या मानाने आम्हाला
प्रतिफळ दिले नाही.

प्रतिसाद ः परमेश्वराचे भय धरणाऱ्यांवर त्याची दया युगानुयुग असते.

**दुसरे वाचन ः** **१ योहान ४ ः ७ – १६**

वाचक ः योहानाचे पहिले पत्र यातून घेतलेले वाचन

*"देवाने प्रथम आम्हावर प्रीती केली."*

प्रिय जनहो, आपण एकमेकांवर प्रीती करावी, कारण प्रीती देवापासून आहे. जो कोणी प्रीती करतो तो देवापासून जन्मलेला आहे. तो देवाला ओळखतो. जो प्रीती करत नाही तो देवाला ओळखत नाही. कारण देव प्रीती आहे. देवाने आपल्या एकुलत्या एक पुत्राला जगात पाठवले आहे, ह्यासाठी की त्याच्याद्वारे आपणास जीवन प्राप्त व्हावे. ह्यावरून देवाची आपल्यावरील प्रीती प्रकट झाली. प्रीती म्हणावी तर हीच, आपण देवावर प्रीती केली असे नाही, तर त्याने तुम्हाआम्हावर प्रीती केली आणि तुमच्याआमच्या पापांचे प्रायश्चित्त व्हावे म्हणून स्वपुत्राला पाठवले. प्रियजनहो, देवाने जर आपल्यावर अशा प्रकारे प्रीती केली तर आपणही एकमेकांवर प्रीती केली पाहिजे. देवाला कोणी कधीही पाहिले नाही. आपण एकमेकांवर प्रीती करत असलो तर देव आपल्या ठायी राहतो आणि त्याची प्रीती आपल्या ठायी पूर्णत्व पावते.

आपण त्याच्यामध्ये आणि तो आपल्यामध्ये राहतो हे आपण ह्यावरून ओळखतो की, त्याने स्वतःच्या आत्म्यातून आपल्याला दिले आहे. आम्ही पाहिले आहे आणि आम्ही साक्ष देतो की, पित्याने पुत्राला जगाचा तारणारा म्हणून पाठवले आहे. येशू हा देवाचा पुत्र आहे, असे जो कोणी कबूल करतो त्याच्या ठायी देव राहतो आणि तो देवाच्या ठायी राहतो. देवाची आपल्यावर जी प्रीती आहे ती आपल्याला कळून आली आहे आणि आपण तिच्यावर विश्वास ठेवला आहे. देव प्रीती आहे, जो प्रीतीमध्ये राहतो तो देवामध्ये राहतो आणि देव त्याच्यामध्ये राहतो.

हा प्रभूचा शब्द आहे.

सर्व ः देवाला धन्यवाद.

**शुभवर्तमान जयघोष** **मत्तय ११ ः २९**

आलेलुया, आलेलुया!
मी मनाचा सौम्य आणि लीन आहे,
माझे जू आपणावर घ्या व माझ्यापासून शिका.
आलेलुया!

**शुभवर्तमान ः** **मत्तय ११ ः २५ – ३0**

वाचक ः मत्तयलिखित शुभवर्तमानातून घेतलेले वाचन.

सर्व ः हे प्रभो, तुझा गौरव असो.

*“मी मनाचा सौम्य आणि लीन आहे.”*

येशू बोलला, “हे पित्या, स्वर्गाच्या आणि पृथ्वीच्या प्रभो, मी तुझे स्तवन करतो. ज्ञानी आणि विचारवंत ह्यांच्यापासून ह्या गोष्टी गुप्त ठेवून त्या तू बाळकांस प्रकट केल्या. खरेच हे पित्या, कारण हेच तुला योग्य दिसले. माझ्या पित्याने माझ्या हाती सर्वकाही दिले आहे. पित्यावाचून पुत्राला कोणी ओळखत नाही आणि पुत्रावाचून व ज्या कोणास त्याला प्रकट करावयाची पुत्राची इच्छा असेल, त्याच्यावाचून पित्याला कोणी ओळखत नाही. अहो कष्टी आणि भाराक्रांत जनहो, तुम्ही सर्व माझ्याकडे या म्हणजे मी तुम्हाला विसावा देईन. मी मनाचा सौम्य आणि लीन आहे. माझे जू आपणावर घ्या व माझ्यापासून शिका म्हणजे तुमच्या मनास शांती मिळेल. कारण माझे जू सोयीचे आणि माझे ओझे हलके आहे.”

प्रभूचे हे शुभवर्तमान.

सर्व ः हे ख्रिस्ता, तुझी स्तुती असो.

**चिंतन** ः आज ख्रिस्तसभा येशूच्या पवित्र हृदयाचा सोहळा साजरा करीत आहे. पोप फ्रान्सिस ह्यांनी ह्या सणाच्या दिवशी सर्व ख्रिस्ती लोकांस आव्हान केलेले आहे की आपण आपल्या जीवनात सदैव येशूच्या पवित्र हृदयाकडे पाहिले पाहिजे व येशूच्या प्रेमाचे अनुकरण केले पाहिजे. येशूच्या पवित्र हृदयाचा सोहळा हे परमेश्वराच्या नितांत प्रेमाचे चिन्ह आहे. येशूचे आपल्यावरील असलेले हे प्रेम त्याच्या दुःख सहन व क्रुसावरील मरणाद्वारे दिसून येते. त्याने आपल्यावर एवढी प्रीती केली की त्याने आपल्या क्रुसावरील मरण व पुनरूत्थानाने आपल्या पापांची क्षमा केली आहे. येशू आपल्याला सातत्याने त्याच्या मार्गावर चालण्यासाठी व प्रेममय जीवन जगण्यासाठी पाचारण करीत आहे. आजच्या शुभवर्तमानात येशूचे आपल्या परमपित्यासोबत असलेले जिव्हाळयाचे नाते दिसून येते. तसेच जे दुःखी कष्टी व भाराक्रांत लोक आहेत त्यांचे सांत्वन करून त्यांना धीर

देत आहे. त्याद्वारे अशा लोकांना तो त्याच्या नितांत प्रेमाची जाणीव करून देत आहे. येशूच्या प्रेमाचे अनुकरण आपण आपल्या जीवनात करतो का?

थोडावेळ शांत राहून आपण चिंतन करू या.

**श्रद्धेचे प्रकटीकरण ः**

स्वर्ग आणि पृथ्वी । सर्व दृश्य व अदृश्य वस्तू ह्यांचा उत्पन्नकर्ता एकच परमेश्वर, सर्वशक्तिमान पिता । ह्यावर मी श्रध्दा ठेवतो । आणि परमेश्वराचा एकुलता एक पुत्र । येशू ख्रिस्त एकच प्रभू । ह्यावर मी श्रध्दा ठेवतो । तो सर्व युगांपूर्वी । पित्यापासून जन्मलेला आहे । परमेश्वरापासून परमेश्वर । प्रकाशापासून प्रकाश । खऱ्या परमेश्वरापासून खरा परमेश्वर । तो पित्याशी एकतत्व असून । जन्मलेला आहे । उत्पन्न केलेला नाही । त्याजकडून सर्व उत्पन्न झाले आहे । तो आम्हा मानवांसाठी । व आमच्या तारणासाठी । स्वर्गातून उतरला । तो पवित्र आत्म्याच्या योगाने । कुमारी मरियेपासून । शरीर धारण करून । मनुष्य झाला । शिवाय आम्हासाठी त्याला कुसी दिले । पोन्ती पिलाताच्या अमदानीत । त्याने दुःख भोगले । तो मरण पावला । त्याला पुरले । शास्त्राप्रमाणे तो तिसऱ्या दिवशी पुन्हा जिवंत झाला । व स्वर्गात चढला । आणि पित्याच्या उजवीकडे बसला आहे । आणि जिवंतांचा व मृतांचा न्याय करावयास । वैभवाने पुन्हा येणार आहे । त्याचा राज्याचा शेवट होणार नाही । आणि पवित्र आत्मा । प्रभू व जीवनदाता । यावर मी श्रध्दा ठेवतो । तो पिता आणि पुत्र यापासून निघतो । आणि पिता व पुत्र । यासहित त्याला भजतात व त्याचा गौरव करतात । तो भविष्य वाद्यांमार्फत बोलला आहे । आणि एकाच पवित्र, कॅथलिक व प्रेषितीय । ख्रिस्तसभेवर मी श्रध्दा ठेवतो । पापक्षमेसाठी मी एक बाप्तिस्मा मान्य करतो । आणि मेलेल्यांचे पुनरूत्थान । व भावी जगातील जीवनाची । मी वाट पाहतो । आमेन.

**आपण प्रार्थना करू याः**

हे प्रभो, आम्हावरील प्रेमाने भरलेल्या तुझ्या पुत्राच्या हृदयाकडे दृष्टी लाव. त्याच्या प्रेमामुळे आमच्या समर्पणाचा स्वीकार कर व आमची पापे क्षमा कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो.

सर्वः आमेन.

प्रभूची प्रार्थना

कुटुंब प्रमुख ः प्रभू येशूच्या शब्दांत आपण परमेश्वर पित्याकडे आत्मविश्वासाने प्रार्थना करू याः

सर्व ः आमच्या स्वर्गीय बापा । तुझे नाव पवित्र मानले जावो । तुझे राज्य येवो । जसे स्वर्गात तसे पृथ्वीवरही । तुझ्या इच्छेप्रमाणे होवो । आमची दररोजची भाकर । आज आम्हाला दे । जशी आम्ही । आमच्या अपराध करणाऱ्यांना क्षमा करतो । तशी तू आमच्या अपराधांची । क्षमा कर । आणि आम्हाला । मोहात पडू देऊ नकोस । पण वाईटापासून । आम्हाला सोडव. आमेन.

शांतीवंदना ः

कुटुंब प्रमुख ः हे प्रभो, सर्व वाईटांपासून आमचे संरक्षण कर. या जीवनात तू आम्हाला शांती दे. आमच्या तारणाऱ्या येशू ख्रिस्ताच्या पुन्हा येण्याची व शाश्वत जीवनाची आशेने वाट पहात असताना आम्ही तुझ्या दयेच्या साहाय्याने पापांपासून दूर राहावे व सर्व संकटापासून सुरक्षित असावे.

सर्व ः कारण राज्य, अधिकार व गौरव सदासर्वदा तुझाच आहे.

कुटुंब प्रमुख ः हे प्रभो येशू ख्रिस्ता, तू आपल्या प्रेषितांस म्हणालास, “मी तुम्हांसाठी शांती राखून ठेवली आहे. मी माझी शांती तुम्हास देतो”. म्हणून आमच्या पापांकडे पाहू नकोस तर तुझ्या ख्रिस्तसभेच्या श्रद्धेकडे पहा आणि आम्हाला तुझ्या स्वर्गीय राज्यातील शांती व ऐक्य देण्याची कृपा कर. तू नित्यजिवी असून सदासर्वदा राज्य करतोस.

सर्व ः आमेन

कुटुंब प्रमुख ः प्रभूची शांती आपल्या बरोबर सदा असो.

सर्व ः आणि तुम्हाबरोबर सुद्धा.

कुटुंब प्रमुख ः आपण एकमेकांस शांतीवंदन करू या.

## आध्यात्मिक ख्रिस्त प्रसाद विधी



माझ्या प्रिय येशू,

तू आल्तारावरील पवित्र साक्रामेंतात जातीने हजर असतोस

ह्यावर माझी नितांत श्रद्धा आहे.

सर्वांपेक्षा माझे तुझ्यावर प्रेम आहे आणि

माझ्यामध्ये तू यावा अशी माझी तीव्र इच्छा आहे.

ह्या दिवसात मी तुला पवित्र मिस्सा साक्रामेंताद्वारे स्वीकारू शकत नसलो

तरी निदान आध्यात्मिक स्वरूपात तू माझ्या अंतःकरणात ये.

तू नेहमीच मजबरोबर असतोस.

मी तुला मिठी मारतो.

तुझ्यापासून माझा कधीही वियोग होऊ देऊ नकोस.

आमेन.

**आपण प्रार्थना करू या ः**

हे सर्वसमर्थ बापा, ह्या संस्कारामुळे आमची हृदये प्रेमाने भरून टाक. तुझा पुत्र ख्रिस्त ह्याच्याकडे आम्हाला आकर्षून घे. आमच्या सभोवतालच्या व्यक्तींमध्ये ख्रिस्ताचे प्रतिबिंब पाहायला आम्हाला साहाय्य कर. ही प्रार्थना आम्ही प्रभू येशूच्या नावाने करतो.

सर्व ः आमेन.

**समारोपविधी**

कुटुंब प्रमुख ः प्रभू आम्हाला आशीर्वाद देवो, सर्व वाईटांपासून आम्हाला सुरक्षित ठेवो आणि आम्हाला सार्वकालिक जीवनाकडे नेवो.

सर्व ः आमेन.

कुटुंब प्रमुख ः आपण सर्व ख्रिस्ताच्या शांतीत जाऊ या.

सर्व ः देवाचे आभार मानू या.

## कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रार्थना

सर्वसमर्थ व दयावंत परमेश्वरा, सर्व जगाला तू तुझे प्रेम सदैव व सर्वत्र दाखवत असतोस .

कोरोना विषाणुची झळ पोहोचलेल्या ह्या विश्वाच्या विविध भागातील लोकांसाठी आम्ही करीत असलेली प्रार्थना दयेने ऐक .

या रोगाच्या संसर्गामुळे निर्माण झालेली परिस्थिती आटोक्यात आणण्यासाठी, ह्या आजाराने पछाडलेल्या व्यक्तींना व त्यांच्या कुटुंबियांना आरोग्यदायी स्पर्श लाभण्यासाठी आम्ही तुझ्याकडे कळकळीने याचना करतो .

डॉक्टर्स, नर्सेस व सेवकवर्ग संबंधितांची काळजी घेत आहेत, सेवा पुरवित आहेत, त्यांना ह्या संसर्गापासून सुरक्षित ठेव आणि ह्यापुढेदेखील कार्य करण्यासाठी त्यांना तुझी वृत्ती व पवृत्ती लाभावी म्हणून आम्ही प्रार्थना करतो .

ह्या आजारावर मात करण्याकरिता लवकरात लवकर प्रभावी उपाय शोधता यावा म्हणून संशोधन करणाऱ्या शास्त्रज्ञांसाठी आम्ही तुझी करूणा भाकतो .

लोकांच्या हितासाठी झटणाऱ्या सरकारी व आरोग्य यंत्रणांना ह्या आजारावर मात करण्यासाठी योग्य पावले उचलता यावीत म्हणून आम्ही प्रार्थना करतो .

ही प्रार्थना आम्ही प्रभूख्रिस्ताद्वारे करतो . आमेन .

गायन ः काळजा येशूच्या ….. . गीत क . ३२०